पाहिजेत
दैनिक अट्टल संकेतसाठी संपूर्ण महाराष्ट्रात वार्ताहर, प्रतिनिधी नेमणे आहेत.
संपर्क - ९६२३४८४४८४

दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com www.attalmat.com RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-२८१ ■ गुरूवार, दि. १६ जानेवारी २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये
■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -281 ■ Thursday, 16 Jan 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

# वाल्मिक कराडला ७ दिवसांची पोलीस कोठडी

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

गेल्या काही दिवसांपासून बीडमधील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण चर्चेत आहे. या प्रकरणातील आरोपींना पोलिसांकडून अटक करण्यात आलेलं आहे, तर या प्रकरणातील एक आरोपी अद्यापही फ़रार आहे. तसेच संतोष देशमुख हत्या प्रकरणात खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडचा सहभाग असल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात येत आहे. वाल्मिक कराडवरही महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी कलमान्वये (मकोका) कारवाई करण्यात आलेली आहे. मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आल्यानंतर वाल्मिक कराडला एसआयटीने ताब्यात घेतलं. त्यानंतर आज वाल्मिक कराडला एसआयटीने बीडच्या न्यायालयात हजर केलं.

यावेळी न्यायालयात एसआयटी आणि सरकारी वकिलांसह वाल्मिक कराडच्या वकिलांनी न्यायालयासमोर आपआपली बाजू मांडली. यानंतर न्यायालयाने वाल्मिक कराडला ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. दरम्यान, वाल्मिक कराडला ७ दिवसांनी पुन्हा न्यायालयात हजर केलं जाणार आहे. तसेच न्यायलयात आज नेमकं काय-काय घडलं? याची माहिती वकील सिद्धेश्वर ठोंबरे यांनी दिली आहे.



माहिती देताना माध्यमांशी बोलताना वकिलांनी सांगितलं की, ङ्गसरकारी पक्षातर्फे वाल्मिक कराडला १० दिवसांची पोलीस कोठडी मागितली होती. तसेच १० वेगवेगळे मुद्दे न्यायालयासमोर मांडण्यात आले होते. मात्र, आम्ही न्यायालयाला सांगितलं की याआधी खंडणीच्या गुन्ह्यात १५ दिवसांची कोठडी देण्यात आली होती. त्या खंडणीच्या गुन्ह्यात कुठेही वाल्मिक कराड आणि संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा संबंध दिसून आलेला नसल्याचं आम्ही न्यायालयाला सांगितलं. त्यामुळे आता २२ जानेवारी रोजी पुन्हा न्यायालयात सुनावणी पार पडणार आहे. तेव्हा न्याय ालय काय निर्णय देतं हे महत्वाचं असणार आहेङ्घ, अशी माहिती वाल्मिक कराडची बाजू मांडणाऱ्या वकिलांनी सांगितली.

दरम्यान, न्यायालयात वाल्मिक कराडच्या विरोधात विविध मुद्दे एसआटीच्यावतीने उपस्थित करण्यात आले. मात्र, एसआटीच्यावतीने उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांनंतर वाल्मिक कराडची बाजू मांडणाऱ्या वकिलांनी हे सर्व आरोप फेटाळून लावले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने वाल्मिक कराडला २२ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. आता पुढील सुनावणी २२ जानेवारी रोजी होणार आहे.

न्यायालयाबाहेर कराडच्या समर्थकांची घोषणाबाजी

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात वाल्मिक कराडला ७ दिवसांची पोलीस कोठडी न्यायालयाने सुनावल्यानंतर न्यायालयाबाहेर वाल्मिक कराडच्या समर्थकांनी जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे न्यायालयाबाहेर काहीवेळ गोंधळाचं वातावरण निर्माण झालं होतं. मात्र, त्यानंतर पोलिसांनी तात्काळ वाल्मिक कराडच्या समर्थकांना बाजूला केलं. तसेच वाल्मिक कराडच्या काही समर्थकांना ताब्यात घेतलं. त्यानंतर गोंधळाची परिस्थिती नियंत्रणात आली.

## ‘धनंजय मुंडे सरकारवरील डाग, त्यांच्या गुंडाची टोळी थांबवा, अन्यथा आम्हीः’, मनोज जरांगेंचा मोठा इशारा

बीडमधील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण मागील काही दिवसांपासून चर्चेत आहे. या प्रकरणातील आरोपींना पोलिसांनी अटक केलेलं आहे. तसेच खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडचा सहभाग संतोष देशमुख हत्या प्रकरणात असल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, वाल्मिक कराडवर मकोका कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आल्यानंतर एसआयटीने वाल्मिक कराडला आज बीड न्यायालयात हजर केलं होतं. यावेळी न्यायालयाने वाल्मिक कराडला ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

वाल्मिक कराडला ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावल्यानंतर न्यायालयाच्या बाहेर वाल्मिक कराडच्या समर्थकांनी जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे काहीवेळ न्यायालयाच्या बाहेर गोंधळाचं वातावरण निर्माण झालं होतं. या संदर्भात आता मनोज जरांगे पाटील यांनी प्रतिक्रिया देत राज्य सरकारला इशारा दिला आहे. तसेच धनंजय मुंडे यांच्यावरही त्यांनी जोरदार हल्लाबोल केला आहे. ‘धनंजय मुंडे सरकारवरील डाग आहेत, त्यांच्या गुंडाची टोळी थांबवा, अन्यथा आम्ही हे सहन करणार नाहीत’, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला दिला आहे.

मनोज जरांगे काय म्हणाले?

संतोष देशमुख यांच्याबाबत आरोपींना काहीही दया आली नाही, आरोपींनी मजा घेतली. तसेच खंडणीतील आरोपीने वाचण्यासाठी सरकारमधील मंत्र्याला फ़ोन केला असेल. खंडणीतील आरोपी, खुनातील आरोपी यांनी कोणाला फ़ोन केले? कये यायला पाहिजे. सरकारने आता म्हणू नये की आम्हाला हे आढळून आलं नाही, आणि ते आढळून आलं नाही. या प्रकरणातील एकही आरोपी सुटता कामा नये. ही सर्व जबाबदारी आता मुख्यमंत्री देवेंद्र फ़डणवीस यांची आहे. परळीला लागलेला हा डाग आणि धनंजय मुंडेंची टोळी आहे, ही टोळी थांबली पाहिजेङ्घ, असा हल्लाबोल मनोज जरांगे यांनी केला.

वाल्मिक कराडला न्यायालयाने ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. यानंतर न्यायालयाबाहेर वाल्मिक कराडच्या समर्थकांनी घोषणाबाजी केली. यासंदर्भात बोलताना मनोज जरांगे यांनी म्हटलं की, यासाठीच धनंजय मुंडे आले होते. संतोष देशमुखांच्या कुटुंबियांना भेटण्यासाठी धनंजय मुंडेंना माणुसकी राहिली नाही. त्यांना फ़क्त पद आणि पैसे पाहिजेत.

खंडणीतील आरोपी हा हत्या प्रकरणातील आरोपी आहे. बीड जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहिली पाहिजे. मात्र, धनंजय मुंडेंना राज्यात दंगली घडवायच्या आहेत. त्यांचं पाप झाकण्यासाठी त्यांची टोळी रस्त्यावर उतरवली जात आहे. धनंजय मुंडेंना जातीय दंगली घडवायच्या आहेत, मात्र, मुख्यमंत्र्यांनी त्यांना थांबवावं. अशा टोळीमुळे सर्वसामान्य लोकांना त्रास झाला तर आम्ही सहन करणार नाहीत असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला.

आरोपींना सोडून द्या, यासाठी आंदोलन करणाऱ्यांच्या घरी जाऊन धनंजय मुंडे भेटतात. त्यामुळे जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्था धनंजय मुंडे यांना चांगली ठेवायची नाही का? कारण न्यायालयासमोर जाऊन गोंधळ करतात आणि पोलिसांनी दादागिरी करु नये, असं हे बोलतात. ही भाषा धनंजय मुंडेंच्या टोळीची आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारला हा डाग आहे. सरकारला डाग लावण्याचं काम धनंजय मुंडे करत आहेत. आम्हाला आता त्यांच्याबाबत शंका यायला लागली आहे. पण देवेंद्र फडणवीस आणि अजित पवारांना माझं आवाहन आहे की बीड जिल्ह्याची कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहिली पाहिजे. त्यासाठी धनंजय मुंडेंच्या गुंडाची टोळी थांबवा, जर हे आरडाओरडा करायला लागले तर आम्ही सहन करणार नाहीतङ्घ, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला.

## हळदी-कुंकू : ऐकमेकांना वाण देवून महिला नात्यांमधील गोडवा देखील जपतात



छत्रपती संभाजीनगर येथील म्हाडा कॉलनीतील महादेव मंदिर, विठ्ठल मंदिराच्या परिसरात मकरसंक्रांतीनिमित्त महिलांनी हळदी-कुंकू कार्यक्रम संपन्न केला तसेच एकमेकांना वाण देखील वाटले. उर्वरित छायाचित्र पान ४ वर

## स्टेट बँक ऑफ इंडियाची १५ हजार कोटींची फसवणूक; तीन वर्षांतील तपशील माहिती अधिकारातून समोर

**नागपूर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

स्टेट बँक ऑफ इंडियाची १ जानेवारी २०२२ ते ३१ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत ३१ हजार २३७ प्रकरणांमध्ये १५ हजार १९१.७२ कोटी रुपयांनी फ़सवणूक झाल्याची बाब माहिती अधिकारातून पुढे आली आहे.

एकूण फ़सवणुकींमध्ये २२ हजार ४७३ प्रकरणे सायबर फसवणुकीशी संबंधित आहेत. त्यात १६३.४६ कोटी रुपयांची फसवणूक झाली.

इतर संवर्गातील फसवणुकीच्या ८ हजार ७६४ प्रकरणांमध्ये १५ हजार २८.२६ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचेही माहिती अधिकारातून सामाजिक कार्यकर्ते अभय कोलारकर यांनी पुढे आणले.

फसवणुकीमुळे वजा झालेल्या रकमेपैकी किती रक्कम वसूल केली, याबाबत स्टेट बँकेला माहिती मागण्यात आली होती. परंतु, स्टेट बँक ऑफ इंडियाचे केंद्रीय जन माहिती अधिकारी राकेश ऐमा यांनी याबाबत बँकेकडे माहिती उपलब्ध नसल्याचे उत्तर अभय कोलारकर यांना देण्यात आले.

### ऑनलाईन बँकिंगमधून ८५.९२ कोटी लंपास

ऑटोमॅटिक विड्रॉल आणि डिजिटल बँकिंग खात्यातील फ़सवणुकीची माहिती उपलब्ध नसल्याचे बँकेने स्पष्ट केले. ऑनलाईन बँकिंग फसवणुकीच्या ९ हजार ३८ प्रकरणात ८५.९२ कोटी, मोबाईल बँकिंग फसवणुकीच्या ३४२ प्रकरणात ४.६७ कोटी, एटीएममधील १ हजार २०८ प्रकरणात ६.०६ कोटींनी फसवणूक झाल्याची माहितीही स्टेट बँकेने दिली.

## लाडकी बहीण योजनेतील अपात्र महिलांसाठी आर्थिक दंडाचे संकेत

**मुंबई**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र सरकारची मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना खूप चर्चेत आहे. लाडकी बहीण योजना महायुतीच्या विजयासाठी गेम चेंजर ठरली. त्यानंतर आता या योजनेबाबत एक मोठी बातमी समोर येत आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून अपात्र महिलांना स्वतः हून नावे कमी करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असं सांगण्यात येत आहे.

महायुतीचं सरकार आल्यानंतर लाडकी बहीण योजनेत महिलांच्या अर्जाची तपासणी सुरु होणार असल्याची चर्चा होती. मात्र, फ़क्त तक्रारी आल्यास तुमच्या अर्जाची तपासणी केली जाईल, असं आदिती तटकरे यांनी सांगितलं होत. त्यानंतर आता महिला व बालकल्याण विभागाने याबाबत माहिती दिली आहे.

लाडकी बहीण योजनेत निकषात न बसणाऱ्या महिलांना एकतर स्वतः हून नाव बाद करा किंवा पैसे भरावेत, असं सांगण्यात आलं आहे. अपात्र असलेल्या महिलांना योजनेतून नाव कमी करावे किंवा महिला व बालकल्याण विभागाच्या लेखाशिर्षावर पैसे भरावेत, अशी सूचना महिला व बालविकास विभागाचे सचिव अनुपकुमार यांनी केली आहे.

लाडकी बहीण योजनेत लाभार्थ्यांना डिसेंबर महिन्याचा हप्ता वितरीत करण्यात आला आहे. त्यानंतर आता जानेवारी महिन्याच्या हप्त्याची वाट महिला पाहत आहे.

अशातच आता अपात्र लाडक्या बहिणींना स्वतः हून अर्ज बाद करण्यास सांगितले आहे.

दरम्यान, आता ज्या महिला निकषात बसत नाही त्यांनी नाव मागे घ्यावेत किंवा ती रक्कम दंडासहित वसून केली जाईल, असं वक्तव्य छगन भुजबळांनी केले होते. त्यानंतर अपात्र लाडक्या बहिणींना दंड भरावा लागणार असल्याची चर्चा सुरु होती.याआधी धुळ्यातील आणि पुण्यातील दोन महिलांनी अर्ज स्वतः हून बाद केले आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ‘देवाभाऊ’ म्हणताच दिलखुलास हसले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आज मुंबई आणि नवी मुंबईच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी नवी मुंबईतल्या इस्कॉन मंदिरालाही भेट दिली. नवी मुंबईत झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फ़डणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह महायुतीचे दिग्गज नेते उपस्थित होते. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मुख्यमंत्री देवेंद्र फ़डणवीस यांचा उल्लेख देवाभाऊ असा केला. ज्यानंतर देवेंद्र फडणवीस दिलखुलासपणे हसले. कॅमेरात ही दृश्यं कैद झाली आहेत.

**निवडणूक प्रचारात देवेंद्र फडणवीस यांचा उल्लेख देवाभाऊ**

महायुतीला महाराष्ट्रात न भुतो न भविष्यती असं यश मिळालं. तसंच देवेंद्र फ़डणवीस यांच्या नावावर एक विक्रमही या निवडणुकीने घडवून दिला. हा विक्रम म्हणजे देवेंद्र फ़डणवीस यांच्या नेतृत्वात सलग तिसऱ्यांदा म्हणजेच २०१४, २०१९ आणि २०२४ या वर्षांमध्ये झालेल्या निवडणुकांमध्ये भाजपाला १०० हून अधिक जागा मिळाल्या. २०२४ च्या प्रचाराच्या वेळी देवाभाऊ हे नाव देवेंद्र फडणवीसांना संबोधण्यासाठी वापरण्यात आलं. हे नाव त्यांनाही खूप आवडलं. ज्यानंतर देवेंद्र फ़डणवीस यांची ओळख देवाभाऊ, लाडक्या बहिणींचा देवाभाऊ अशीही होऊ लागली. आज पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देवेंद्र फ़डणवीस यांचं कौतुक करताना देवाभाऊ अशी हाक मारली आणि देवेंद्र फ़डणवीस दिलखुलासपणे हसले.

देवाभाऊ हे नाव कसं समोर आलं?

देवाभाऊ म्हणून चर्चेत आणण्याची गरज का पडली असं विचारलं असता फ़डणवीस म्हणाले, देवाभाऊ हे माझं नाव मागच्या आठ ते दहा वर्षांपासून आहे. हे नाव इंटरनेट कम्युनिटीतलं आहे. मी २०१४ मध्ये मुख्यमंत्री झालो होतो तेव्हापासून मला देवाभाऊ असं म्हटलं जातं. आता ते नाव म्हणजेच देवाभाऊ हे आता कार्यकर्तेही म्हणत आहेत. माझं नाव देवाभाऊ असं का करत आहात? असं काही मी कुणाला रोखलं नाही. कारण कुठलाही नेता म्हटला की कार्यकर्ते आणि जनता हा त्याचा परिवार असतो. त्यामुळे ज्या गोष्टीने भावनिक नातं प्रस्थापित होतं त्या गोष्टी चांगल्या असतात. देवेनभाऊ म्हणायचे त्याचं देवाभाऊ झालं इतकंच तसंच ते मलाही आवडतं असं देवेंद्र फ़डणवीस यांनी एका मुलाखतीत सांगितलं होतं. आज याच नावाने पंतप्रधान नरेंद्र मोदींनी हाक मारल्याने देवेंद्र फ़डणवीस दिलखुलासपणे हसले. हा व्हिडीओ देवेंद्र फ़डणवीस यांनी स्वतः पोस्ट केला आहे.

**देवेंद्र फडणवीस यांनी सलग तीनवेळा महाराष्ट्रात भाजपाला मिळवून दिलं मोठं यश**

मुख्यमंत्री या पदावर विराजमान झालेल्या देवेंद्र फ़डणवीस यांनी सलग तीन वेळा भाजपाला मोठं यश मिळवून दिलं आहे. तसंच भाजपाचं महाराष्ट्रातलं बळ वाढवण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. २०२४ ला झालेल्या विधानसभा निवडणुकीत एकट्या भाजपाने १३२ जागा जिंकल्या. ही बाब निश्चितच देवेंद्र फडणवीस यांचं कर्तृत्व दाखवणारीच ठरली. त्यांच्याच म्हणण्याप्रमाणे देवाभाऊ हे नाव त्यांना आधीच मिळालं असलं तरीही २०२४ च्या निवडणूक प्रचारात ते अधिक प्रभावीपणे समोर आलं. देवाभाऊ या नावाचा प्रभाव किती आहे ते पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही तोच उल्लेख केल्याने अधोरेखित झालं.

## आपची हॅट्ट्रिक की भाजपचे पुनरागमन ?

देशाची राजधानी दिल्ली नवीन सरकार निवडण्यासाठी सज्ज आहे. आम आदमी पक्ष तिसऱ्यांदा सत्तेवर येण्यासाठी मैदानात उतरला आहे. भारतीय जनता पक्षाला २७ वर्षांचा वनवास संपवून सत्तेवर यायचे आहे. तर काँग्रेसला स्वत:चे प्रदर्शन चांगले करावयाचे आहे.

दिल्लीची जनता यापैकी कुणाची इच्छा पूर्ण करते हे निकालातून स्पष्ट होईलच. उत्तर भारत कडाक्याच्या थंडीमुळे गारठला असतानाही निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त राजीव कुमार यांनी विधानसभेची निवडणूक जाहीर करून दिल्लीचे तापमान वाढविले आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. दिल्लीचे वातावरण पूर्णपणे तापले आहे. आम आदमी पक्षाने सर्व ७० उमेदवारांची घोषणा केली आहे. भाजपची दुसरी यादी सुध्दा आली आहे. आणि काँग्रेसनेही काही उमेदवार जाहीर केले आहेत. एवढेच नव्हे तर, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या पक्षांनीसुध्दा उमेदवार उतरविले आहेत. असे असले तरी दिल्लीच्या सिंहासनाचा सामना हा तीन राष्ट्रीय पक्षांत होणार आहे. ते म्हणजे आप, भाजप आणि काँग्रेस. याशिवाय क्षेत्रीय पक्ष सुध्दा मैदानात आहेत. परंतु दिल्लीच्या सिंहासनावर या तीन पक्षांपैकी कुणी तर एक बसणार आहे. माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल दिल्लीची सत्ता तिसऱ्यांदा मिळविण्यासाठी मैदानात उतरले आहेत. तर, भारतीय जनता पक्ष २७ वर्षांचा वनवास संपविण्यासाठी पूर्ण ताकद लावून रिंगणात उतरला आहे. काँग्रेसची समस्या वेगळी आहे. काँग्रेसला सत्तेपेक्षा स्वत:चा परफॉर्मन्स सुधारायचा आहे. काही आमदार निवडून आले तर खूप होईल. दिल्लीतील ७० जागांसाठी ५ फेब्रुवारी रोजी एकाच टप्प्यात विधानसभेची निवडणूक होणार आहे. तर, दिल्लीची जनता सत्तेची धुरा कुणाच्या हाती देते हे ८ फेब्रुवारी रोजी निकालातून स्पष्ट होईल. मात्र, यासाठी २०१३, २०१५ आणि २०२० मध्ये झालेल्या निवडणुकीतील राजकीय पक्षांच्या स्थितीवर नजर टाकणे महत्त्वाचे आहे. दिल्लीत २०१३ पासून आम आदमी पक्षाचे सरकार आहे. दिल्लीतील आम आदमी पक्षाच्या सरकारचा हा तिसरा कार्यकाळ आहे. २०१३ मध्ये आपने २८, भाजपने ३१ आणि काँग्रेसने ८ जागा जिंकल्या होत्या. पण, आपने काँग्रेसशी हातमिळवणी करून सरकार स्थापन केले होते. मात्र, हे सरकार फार काळ टिकू शकले नाही. अरविंद केजरीवाल यांनी राजीनामा दिल्यामुळे २०१५ मध्ये दिल्लीत विधानसभा निवडणुका झाल्या. यावेळी आम आदमी पक्षाला प्रचंड बहुमत मिळाले. ७० पैकी ६७ जागांवर आपचा विजय झाला. भाजपचे तीन आमदार निवडून आले होते आणि काँग्रेस भुईसपाट झाली होती. २०२० च्या विधानसभा निवडणुकीतही केजरीवाल यांच्या 'आप'ने पुन्हा चांगले यश मिळविले. यावेळी आपला ७० पैकी ६२ जागा मिळाल्या. मात्र, काँग्रेसला एकही जागा जिंकता आली नाही. अंमलबजावणी संचालनालयाने मद्य धोरण प्रकरणी केजरीवाल यांना तुरूंगात टाकले. मात्र, तुरूंगातून सुटल्यानंतर केजरीवाल यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला आणि आतिशी मर्लोना यांना मुख्यमंत्रिपदी बसवून महिला कार्ड खेळले. महत्त्वाचा मुद्दा असा की, विधानसभेची निवडणूक जिंकण्यासाठी केजरीवाल यांनी तेच कार्ड खेळले आहे जे कार्ड खेळून भाजपने मध्य प्रदेश आणि महाराष्ट्राची निवडणूक जिंकली.

आपने दिल्लीत सरकार आले तर महिलांना २१०० रूपये देण्याची घोषणा केली आहे. यानंतर काँग्रेसनेही २५०० देण्याची घोषणा केली. भाजप महिलांना खूश करण्यासाठी काय करणार? हे अद्याप जाहीर झालेले नाही. परंतु, केजरीवाल यांनी खेळलेला डाव यशस्वी होईल काय? असा प्रश्न सर्वांना पडला आहे. या तिन्ही निवडणुकांमधील मतदानाच्या टक्केवारीवर नजर टाकली तर २०१३ मध्ये काँग्रेसला २४.५५ टक्के, आपला २९.४९ टक्के तर भाजपला ३३.०७ टक्के मते मिळाली. तर २०१५ मध्ये आपला ५४.३४ टक्के, भाजपला ३२.१९ टक्के आणि काँग्रेसला ९.६५ टक्के मते मिळाली होती. यावरून असे दिसून येते की, आपच्या मतपेढीत मोठी घसरण झाली आहे. तर भाजपला आपला मतदानाचा टक्का राखण्यात यश आले आणि २०२० च्या निवडणुकीत त्याचा मतदानाचा टक्का वाढला आहे. अशात काँग्रेसचा परफॉर्मन्स सुधारला तर त्याचा फटका सरळ आम आदमी पक्षाला बसणार आहे.असे झाले तर दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपचा मार्ग सोपा होईल. याशिवाय, आम आदमी पक्ष दिल्लीत १० वर्षांहून अधिक काळ सत्तेत आहे, यामुळे आपला सत्ताविरोधी लाटेचा सामना करावा लागू शकतो. यासाठी आपने दोन डझन आमदारांची तिकिटे कापून नवीन लोकांना संधी दिली आहे. यामुळे आप आणि भाजप यांच्यात अटीतटीची लढत होणे जवळपास नक्की आहे. काँग्रेसची भूमिका नेमकी कशी असते हे निकालांअंतीच स्पष्ट होऊ शकेल. थोडक्यात, दिल्लीची निवडणूक खूपच रंजक असणार आहे. यावेळी दिल्लीत १ कोटी ५५ लाख २४ हजार ८५८ मतदार आहेत. यात महिला मतदारांची संख्या

७१ लाख ७३ हजार ९५२ आहे. अर्थात, देशातील इतर अनेक राज्यांप्रमाणे, दिल्लीतही महिला मतदार निवडणुकीतील विजय किंवा पराभवात महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. दिल्लीपेक्षा खूप मोठे आणि महत्त्वाचे राज्य असलेल्या पंजाबमध्ये आपचे सरकार आहे. पण देशाची राजधानी दिल्लीत आपचे सरकार आणता आले नाही तर त्याचा फटका थेट केजरीवाल यांच्या प्रतिमेवर पडल्याशिवाय राहणार नाही. या निवडणुकीत आपचा पराभव झाला तर केजरीवाल यांची पक्षावरील पकड कमकुवत होईल आणि इंडिया आघाडीतील त्यांचे वर्चस्वही कमकुवत होईल. कारण इंडिया आघाडीतील सर्वात मोठा पक्ष असलेल्या काँग्रेसने लोकसभा निवडणुकीदरम्यान अनेक राज्यांमध्ये आपसोबत आघाडी केली होती. मात्र, विधानसभेच्या निवडणुकीत दोन्ही पक्ष वेगवेगळे लढत आहेत.

# भारतीय विंग कमांडर- राकेश शर्मा

### (राकेश शर्मा जन्मदिन-वाढदिवस विशेष.)

**राकेश शर्मा हे अंतरिक्षात जाणारे पहिले भारतीय आहेत. भारताचा पहिला आणि जगाचा १३८वा अंतराळवीर बनण्याचा सन्मान विंग कमांडर राकेश शर्मा यांनी पटकावला, तो दि.२ एप्रिल १९८४ रोजी. भारत-रशिया अवकाश संशोधन मंडळ कार्यक्रमांतर्गत रशियाच्या सोयूझ टी-११ यानातून दोन रशियन अंतराळ संशोधकासमवेत राकेश शर्मा यांनी अवकाश सफरीचा अनुभव घेऊन या क्षेत्रात प्रगतीचे नवे दालन भारतीयांसाठी खुले केले. अशा रोचक माहिती श्री कृष्ण कुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी येथे प्रस्तुत करत आहेत... संपादक.**

राकेश शर्मा यांचा जन्म दि.१३ जानेवारी १९४९ रोजी पटियाला, पंजाब राज्य, भारत येथे झाला. एक भारतीय लष्करी वैमानिक आणि अंतराळवीर, अंतराळातील पहिले भारतीय नागरिक आहेत. सन १९७०मध्ये शर्मा भारतीय हवाई दलात वैमानिक म्हणून रुजू झाले. सन १९७१च्या बांगलादेश युद्धात त्यांनी मिग- २१मध्ये २१ लढाऊ मोहिमा उडवल्या. सन १९८२मध्ये त्यांची सोव्हिएत-भारतीय संयुक्त अवकाशयानासाठी अंतराळवीर म्हणून निवड झाली. दि.३ एप्रिल १९८४ रोजी त्यांनी दोन सोव्हिएत अंतराळवीर, कमांडर युरी मालीशेव्ह आणि फ्लाइट इंजिनियर गेनाडी स्ट्रेकालोव्ह यांच्यासोबत सोयुझ टी- ११वर उड्डाण केले, ते अंतराळ स्थानक सॅल्युट ७वर गेले.

तेथे शर्मा यांनी अंतराळातून भारताचे छायाचित्रण आणि अभ्यासासाठी व्यायामाचा समावेश असलेले प्रयोग केले. वजनहीनतेच्या वेळी योगाचे शरीरावर होणारे परिणाम . हे मिशन जवळपास आठ दिवस चालले आणि शर्मा आणि त्यांचे क्रू सोबती ११ एप्रिल रोजी कझाकस्तानमध्ये दाखल झाले. सन १९८७मध्ये ते भारतीय कंपनी हिंदुस्तान एरोनॉटिक्समध्ये मुख्य चाचणी पायलट म्हणून रुजू झाले. सन २००१मध्ये त्यांनी हिंदुस्थान एरोनॉटिक्स सोडले आणि बंगलोर- बेंगळुरू येथील प्रक्रिया-व्यवस्थापन कंपनी, ऑटोमेटेड वर्कफ्लोच्या बोर्डाचे अध्यक्ष झाले.



- संकलन व शब्दांकन -
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा-
७७७५०४१०८६.

राकेश शर्मा पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याशी अंतराळातून बोलत होते. 'अंतराळातून भारत कसा दिसतो?' या प्रश्नाला त्यांनी 'सारे जहाँसे अच्छा हिंदोस्ताँ हमारा' असे अभिमानी उत्तर दिले होते. पतियाळात जन्मलेले राकेश भारतीय वायू दलात वैमानिक होते. नंतरच्या काळात त्यांचा अशोक चक्र देऊन सन्मान केला गेला.

राकेश शर्मा हे भारतीय एअर फ्रोर्समध्ये विंग कमांडर होते. वयाची २३ वर्षे पूर्ण करण्यापूर्वीच त्यांनी मिग- २१ या फ्रायटर जेटमधून २१ वेळा उड्डाण केले होते. भारताचे पहिले अंतराळवीर राकेश शर्मा यांचा आज वाढदिवस आहे. दि.१३ जानेवारी १९४९ रोजी पटियालामध्ये त्यांचा जन्म झाला होता. दि.३ एप्रिल १९८४ रोजी अंतराळात पोहोचणारे पहिले भारतीय होण्याचा मान त्यांनाच मिळाला होता. सुमारे आठ दिवस ते अंतराळात राहिले होते. सन १९८२ साली त्यांची अंतराळ यात्रेसाठी निवड झाली. इस्रो आणि सोव्हिएत संघ यांच्या संयुक्त मोहिमेंतर्गत सोयूज टी-११ या यानातून ते अंतराळात गेले होते.

सारे जहाँ से अच्छा..,

सोयूज टी-११ मधील क्रूसोबत एका जॉइंट कॉन्फ्रन्समध्ये भारताने पहिल्यांदाच अंतराळातील आपल्या नागरिकासोबत गप्पा मारल्या होत्या. यावेळी भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी विचारलं होतं, की अंतराळातून भारत कसा दिसतोय? यावेळी उत्तर देताना राकेश शर्मा हिंदीतून म्हणाले होते, 'सारे जहाँ से अच्छा..!'

पुढचं वर्षही गाजवणार 'इस्रो'; पहिल्या दिवसापासूनच होणार मोहिमांची सुरुवात! राकेश शर्मांनी एका मुलाखतीमध्ये सांगितलं होतं, की सोयूज यानाच्या प्रक्षेपणाच्या दिवशी त्यांना अगदीच 'बोरिंग' वाटत होतं. या क्षणाचा सराव त्यांनी बऱ्याच वेळा केला होता. त्यामुळे त्या दिवशीही अगदी रुटीन असल्याप्रमाणेच सगळं पार पडलं, असं ते सांगतात.

ते सध्या काय करतात? या आपल्या प्रश्नाचे उत्तर - राकेश शर्मा हे सध्या कुन्नूर नावाच्या एका छोट्या गावात आपल्या पत्नीसोबत राहतात. प्रसिद्धीच्या झगम गाटापासून दूर अगदी साधं आयुष्य ते जगत आहेत. अर्थात, ते अंतराळ मोहिमांपासून नक्कीच दूर झाले नाहीत. ते सध्या इस्रोच्या गगनयान मोहिमेसाठी सल्लागार म्हणून मदत करत आहेत. गगनयान मोहिमेच्या माध्यम ातून भारत पहिल्यांदाच स्वतः स्पेसमध्ये अंतराळवीर पाठवणार आहे, हे विशेष!

अंतराळवीर मा.राकेशजी शर्मा यांना वाढदिवसाच्या अनंत कोटी हार्दिक हार्दिक शुभेच्छा.

# युद्धनौकामुळे नौदल बनले सामर्थ्यवान; पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला विश्वास व्यक्त

नवी दिल्ली : आत्मनिर्भर भारतासाठी आणि भारतीय नौदलासाठी आजचा दिवस महत्त्वपूर्ण आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी भारतात नौदलाची स्थापना केली आणि त्याला बळकट केले आहे. २१ व्या शतकातील नौदलाला सशक्त करण्यासाठी आम्ही महत्त्वपूर्ण पाऊल उचललंय. भारतीय बनावटीच्या युद्धनौका नौदलात सामील होत आहेत, याच्या निर्मितीत असलेल्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. भारताचा समृद्ध इतिहास राहिला आहे, भारत आता एक प्रमुख सागरी शक्ती म्हणून उदयास येत आहे. आज ताफ्यात आलेल्या युद्धनौकांमध्ये या सामर्थ्याची झलक दिसत असून युद्धनौकांमुळे शिवाजी महाराजांच्या भूमीवरून नौदलाला अधिक सामर्थ्यवान केले गेले असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी बुधवारी महाराष्ट्र दौऱ्यावर असून मुंबईच्या नौदल डॉकयार्डमध्ये मोदी यांनी 'आयएनएस सुरत', 'आयएनएस नीलगिरी' आणि 'आयएनएस वाघशीर' या तीन युद्धनौका राष्ट्रार्पण केल्या. तिन्ही जहाजांची बांधणी मुंबईतील माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड येथे करण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मुंबईत आगमन झाल्यावर त्यांना नौदलाकडून गार्ड ऑफ़ ऑनर देण्यात आला. यावेळी देशाचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फ़डणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार उपस्थित होते.

यावेळी बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, आजचा दिवस भारताचा सागरी वारसा नौदलाच्या गौरवशाली इतिहासासाठी आणि आत्मनिर्भर भारत अभियानासाठी खूप मोठा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी नौदलाला नवे सामर्थ्य आणि दूरदृष्टी दिली. आज या पवित्र भूमीवर आपण २१ व्या शतकातील नौदलाला भक्कम करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलत आहोत. एकाच वेळी एक डिस्ट्रॉयर, फ्रिगेट आणि पाणबुडी यांचे अनावरण करण्याची ही पहिलीच वेळ आहे. तिन्हीही युद्धनौका मेड इन इंडिया आहेत ही अभिमानाची गोष्ट आहे. २१ व्या शतकातील भारताचे सैन्य सामर्थ्य अधिक सक्षम आणि आधुनिक असणे हे देशाच्या प्राधान्यांपैकी एक आहे. पाणी, जमीन, आकाश असो, खोल समुद्र असो अथवा अनंत अवकाश असो, भारत सर्व ठिकाणी आपल्या हितांचे रक्षण करत आहे. यासाठी सतत सुधारणा केल्या जात असल्याचे पंतप्रधान मोदी यांनी नमूद केले.

**आयएनएस सुरत जगातील सर्वात मोठी युद्धनौका**

राष्ट्रार्पण केलेल्या नौदलाच्या तीन प्रमुख युद्धनौकांमुळे सागरी सुरक्षेमध्ये वाढ होईल. 'आयएनएस सुरत' हे पी१५बी मार्गदर्शित क्षेपणास्त्र विनाशक प्रकल्पाचे चौथे आणि शेवटचे जहाज आहे. जगातील सर्वात मोठ्या आणि सर्वात अत्याधुनिक विनाशकांपैकी एक हे जहाज आहे. यातील ७५ टक्के सामग्री स्वदेशी आहे. आयएनएस निलगिरी, हे पी१७ए स्टेल्थ फ्रिगेट प्रकल्पातील पहिले जहाज आहे.



**पी७५ स्कॉर्पीन प्रकल्पातील सहावी पाणबुडी**

आयएनएस वाघशीर, पी७५ स्कॉर्पीन प्रकल्पातील सहावी आणि अंतिम प्रकारातील पाणबुडी आहे. फ्रान्स नौदलाच्या समूहाच्या सहकार्याने तिची बांधणी करण्यात आली आहे. या तिन्ही युद्धनौकांमुळे भारतीय नौदल अधिक सुसज्ज होणार आहे.

**पी १७ए स्टेल्थ फ्रिगेट प्रकल्पातील पहिले जहाज**

आयएनएस नीलगिरी हे पी१७ए स्टेल्थ फ्रिगेट प्रकल्पातील पहिले जहाज आहे. हे जहाज भारताच्या नौदल डिझाइन कौशल्याचे प्रतीक आहे. त्यात प्रगत स्टेल्थ तंत्रज्ञान आणि अधिक काळ टिकून राहण्याची क्षमता आहे.

**युद्धनौका, विनाशिका आणि पाणबुडी एकाच वेळी राष्ट्राला समर्पित**

निलगिरी युद्धनौका, सूरत विनाशिका आणि वाघशीर पाणबुडीचे लोकार्पण ही नौदलाच्या गौरवशाली परंपरेला भविष्यातील आकांक्षेशी जोडणारी ऐतिहासिक घटना आहे. यामुळे भारताची वाटचाल मोठ्या सागरी शक्तीच्या दिशेने सुरू असून भारताच्या सुरक्षा आणि प्रगतीला मोठे सामर्थ्य प्राप्त झाले असल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

भारतात निर्मित सूरत आणि निलगिरी (युद्धनौका) तसेच वाघशीर (पाणबुडी) या तीन महत्वाच्या नौका मुंबईतील नेव्हल डॉकयार्ड येथे झालेल्या कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते राष्ट्र ाला समर्पित करण्यात आल्या. राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फ़डणवीस, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, नौसेना प्रमुख दिनेशकुमार त्रिपाठी यांच्यासह मान्यवर यावेळी उपस्थित होते.

प्रधानमंत्री मोदी म्हणाले की, संपूर्ण विश्व हा परिवार मानून भारत विकासाच्या भावनेने काम करतोय. तीन आघाडीच्या लढाऊ जहाजांचा नौदलामध्ये समावेश एक मजबूत आणि स्वावलंबी संरक्षण दल निर्माण करण्यासाठी भारताची अटल वचनबद्धता अधोरेखित करते. भारतीय समुद्र क्षेत्रात भारत प्रथम प्रतिसादकर्ता म्हणून उदयास आला आहे. नौदलाने अनेकांचे जीव वाचवले आहेत आणि राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्र ीय मालवाहतूक सुरक्षित केली आहे. यामुळे जगभरातून भारतावर विश्वास वाढला असून आज जागतिक स्तरावर, विशेषत: 'ग्लोबल साउथ'मध्ये भारत एक विश्वासार्ह आणि जबाबदार भागीदार म्हणून ओळखला जातो. तीन युद्धनौकांचे राष्ट्रार्पण सैन्याबरोबरच आर्थिक दृष्टीने सुद्धा महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. जमीन, पाणी, हवा, खोल समुद्र किंवा अनंत अवकाश अशा सर्वच क्षेत्रात भारताने आपले हित जपून तिनही सेनादलांच्या माध्यमातून मागील काही वर्षात आत्मनिर्भर बनण्याची प्रशंसनीय वाटचाल सुरू ठेवली आहे. एकाच वेळी विनाशिका, युद्धनौका आणि पाणबुडी कार्यान्वित होत असल्याने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पवित्र भूमीवर भारतीय नौदलाने स्वावलंबी होण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असल्याचे प्रधानमंत्री श्री.मोदी यांनी यावेळी नमूद केले. भारतीय सैनिकांना आता भारतीय युद्ध सामग्री उपलब्ध होत असून १०० हून अधिक देशांना संरक्षण सामग्री निर्यात केली जात आहे. या माध्यमातून 'मेक इन इंडिया' योजनेचा विस्तार होत असून आर्थिक प्रगतीचे दार उघडून भारताच्या तिसऱ्या मोठ्या अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करण्याच्या प्रक्रियेत म ोठा हातभार लागत असल्याचे गौरवोद्गार प्रधानमंत्री मोदी यांनी काढले.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंग म्हणाले की, एकाच वेळी तीन युद्धनौका राष्ट्राला अर्पण होत असल्याने भारतीय समुद्री क्षेत्रात देशाची ताकद आणि महत्व वाढले आहे. या क्षेत्रातून मोठे व्यापार होत असून संरक्षण क्षेत्रात भारत आत्मनिर्भर होत आहे. आधुनिकीकरणावर भर देण्यात येत असून या तिनही नौका त्यादृष्टीने सक्षम असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. नौदल प्रमुख ॲडमिरल त्रिपाठी यांनी नौदलासाठी गौरव आणि प्रतिष्ठेचा दिवस असल्याचे सांगून या निमित्ताने शक्ती, क्षमता आणि आत्मनिर्भरता साजरी केली जात असल्याचा उल्लेख केला.

**भारतीय नौदलाला ट्रिपल बूस्टर!**

भारतीय नौदलाच्या मुंबईतील गोदीत आयएनएस सूरत, आयएनएस निलगिरी या युद्धनौका आणि आयएनएस वाघशीर या पाणबुडीचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते देशाला लोकार्पण करण्यात आले. केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, महाराष्ट्राचे राज्यपाल सीपी राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह नौदलाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. भारतीय नौदलासाठी आजचा दिवस इतिहासात सुवर्णअक्षरांनी नोंदवावा असा आहे. एकाच दिवशी दोन युद्धनौका आणि एक पाणबुडी नौदलाच्या ताफ्यात येण्याची पहिलीच वेळ आहे.

भारतीय नौदलातील अधिकारी राहुल नार्वे कर यांनी माहिती दिली. निलगिरी फ्रिगेटवर शत्रूशी लढण्यासाठी शस्त्र आणि मिसाईल्स आहेत. यामध्ये प्रामुख्याने आठ ब्रह्मोस मिसाईल आहेत. त्या समुद्रावर मारा करतील. निलगिरीवर ३२ बराक मिसाईल असून त्या आकाशातील टारगेटवर मारा करतील. यावर पाणबुडी विरोधी रॉकेट लॉन्चर असून ते पाण्यातून मारा करतील. आयएनएस निलगिरी ५५०० नॉटिकल प्रवास करू शकते, स्पीड २८ नॉटिकल प्रति तास आहे. नौदलाचे दुसरे अधिकारी प्रताप पवार यांनी आयएनएस निलगिरीसंदर्भातील माहिती दिली. ते म्हणाले या युद्धनौकेचं वजन ६६७० टन असून लांबी १४९ मीटर आहे. यामध्ये स्टेल्थ डिझाईन अँड टेक्नॉलॉजीचा वापर करण्यात आला आहे. शत्रूच्या रडार मध्ये टिपली जाऊ नये यासाठी अनेक उपकरण हे समोरील डेक वर न ठेवता आत मध्ये घेण्यात आले आहेत, असे प्रताप पवार यांनी सांगितले.


आयएनएस विशाखापटनम, आयएनएस मोरम्युगाव आणि आयएनएस इंफ्राळ नंतर प्रोजेक्ट १५ बी ची शेवटची युद्धनौका आयएनएस सूरत नौदलाच्या ताफ्यात दाखल झाली आहे. गुजरात राज्याच्या एका शहराचं नाव पहिल्यांदाच युद्धनौकेला देण्यात आलं आहे. आयएनएस सूरत या युद्धनौकेने निर्मितीपासून ते लॉंच आणि लॉंच ते कमिशनिंग पर्यंत जो कालावधी लागला त्यामध्ये एक रेकॉर्ड प्रस्थापित केला आहे. सर्वात कमी वेळात हा सगळा प्रवास पूर्ण करत ३१ महिन्यात जलावतरण ते कमिशनिंगचा काळ पूर्ण करत ही युद्धनौका नौदलात दाखल झाली. या युद्धनौकेची खासियत म्हणजे यामध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर तर केला आहे शिवाय पहिल्यांदाच निर्मिती वेळीच महिलांसाठी राहण्याची वेगळी सुविधा आहे. नौदल अधिकाऱ्यांची आणि सेलरची वाढती संख्या पाहता ही सुविधा करण्यात आली आहे, अशी माहिती आस्था कंबोज आणि अहिल्या अरविंद या महिला नौदल अधिकाऱ्यांनी दिली.

आयएनएस सूरत युद्धनौकेची लांबी १६४ मीटर असून रुंदी १८ मीटर तर वजन ७६०० टन आहे. शत्रूंवर तिन्ही बाजूंनी मारा करण्यासाठी इथे सुद्धा ब्रह्मोस मिसाइल, बराक मिसाईल, पाणबुड्या विरोधी रॉकेट लॉन्चर आणि स्पेशल भारतीय बनावटीच्या गन्स आहेत. भारतीय नौदलात सायलेंट किलर म्हणून ओळख असलेली आयएनएस वाघशीर पाणबुडी प्रोजेक्ट ७५ च्या स्कॉर्पियन वर्गाची सहावी आणि शेवटची पाणबुडी आहे. २०२२ साली जलावतरण झाल्यानंतर तिच्या सर्व चाचण्या पूर्ण झाल्यानंतर दोन वर्षानंतर ती भारतीय नौदलाच्या ताफ्यात दाखल झाली आहे. पाणबुडीची लांबी ६७.५ मीटर तर उंची १२.३ मीटर आहे. ही खोलवर समुद्रात जाऊ शकते आणि शत्रूशी दोन हात करू शकते.

# किनगाव येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा समाजाला प्रगती आणि दिशा दाखवणारा दीपस्तंभ ठरेल!

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

किनगाव, ता.फुलंब्री येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे पूर्ण झालेल्या कामाची पाहणी आज बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता श्री.अतुल चव्हाण यांनी केली. याप्रसंगी ते बोलताना म्हणाले की, 'जन्मभूमी आणि मातृभूमी किनगाव-माझ्या आयुष्याचं उगमस्थान आहे. जिथे मी घडलो, शिकलो, आणि आयुष्याला योग्य दिशा मिळाली.



'या गावाशी माझं नातं केवळ रक्ताचं नाही, तर भावनिक, सांस्कृतिक, आणि आत्म्याचंही आहे. कितीही मोठ्या पदावर गेलो तरीही माझी गावाशी असलेली नाळ तुटू दिली नाही आणि ती तुटणारही नाही.' किनगावमध्ये उभारल्या जाणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याबाबत बोलताना त्यांनी सांगितलं की, 'हा पुतळा केवळ एक स्मारक नसून आदरणीय राजस्थानचे
महामहीम राज्यपाल श्री. हरिभाऊ बागडे (नाना) यांच्या समरसतेच्या विचारांचा वारसा पुढे नेणारा दीपस्तंभ ठरणार आहे. सामाजिक प्रगती, समता, आणि प्रेरणा यासाठी तो गावकऱ्यांना एक नवी दिशा दाखवेल.' या पुतळ्याच्या उभारणीसाठी कामांची पाहणी करताना चव्हाण यांच्यासोबत रि.पा.इं.चे पदाधिकारी श्री.मिलिंद शेळके, श्री.बाबुराव कदम, श्री.राजेंद्र दादा प्रधान उपस्थित होते. पाहणी केली होती. '१४ जानेवारी २०२५ रोजी, सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.श्री.रामदासजी आठवले यांच्या शुभहस्ते या पुतळ्याचं अनावरण करण्यात आले.

## ऐतिहासिक अभिमानास्पद सोहळा

"किनगावला आदर्शगाव बनवण्याच्या स्वप्नाविषयी बोलताना ते म्हणाले, 'पोपटराव पवार यांच्या मार्गदर्शन खाली, किनगावच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, पायाभूत सुविधा, सामाजिक ऐक्य, आणि प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. या पुतळ्याचा अनावरण सोहळा हे त्या प्रयत्नांचं एक महत्त्वाचं पाऊल आहे.' ते पुढे म्हणाले, 'हा क्षण माझ्यासाठी केवळ एक जबाबदारी नाही तर माझ्या जन्मभूमीप्रती कृतज्ञतेचं प्रतीक आहे. गावाच्या प्रगतीसाठी सुरू असलेल्या या प्रवासात आपण सर्वांनी सहकार्य केले म्हणूनच हे शक्य झाले आहे. असे गौरव उद्गार त्यांनी गावकऱ्यांशी व्यक्त केले. १४ जानेवारीला होणाऱ्या ऐतिहासिक सोहळ्याचा साक्षीदार होण्यासाठी नागरिक उपस्थित होते.

-अतुल चव्हाण
मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे.



**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.श्री.रामदास आठवले यांच्या हस्ते आदर्श गाव किनगावमध्ये अनावरण करण्यात आले. त्याप्रसंगी रामदास आठवले यांचा सत्कार करताना आमदार अनुराधाताई चव्हाण, अतुल चव्हाण.**

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.श्री. रामदास आठवले यांच्या हस्ते आदर्श गाव किनगाव मध्ये अनावरण करण्यात आले. सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता श्री.अतुल चव्हाण यांनी या पुतळ्याचे उत्कृष्ट रीतीने पूर्ण केले आहे. हा पुतळा केवळ एक स्मारक नसून आदरणीय राजस्थानचे महामहीम राज्यपाल श्री.हरिभाऊ नाना बागडे यांच्या समरसतेच्या विचारांचा वारसा पुढे नेणारा दीपस्तंभ ठरणार आहे. सामाजिक प्रगती, समता, आणि प्रेरणा यासाठी तो गावकऱ्यांना एक नवी दिशा दाखवेल. हा सोहळा किनगावसाठी ऐतिहासिक आणि अभिमानास्पद ठरेल..

यावेळी श्री.बाबुराव कदम साहेब, पुणे सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता श्री.अतुलजी चव्हाण, जिल्हाध्यक्ष भाजपा श्री.सुहासभाऊ सिरसाठ, श्री.मिलींद आण्णा शेळके, श्री.संजय ठोकळ, श्री.सांडुअण्णा जाधव, श्री.शिवाजी पाथ्रीकर, श्री.जितेंद्र जैस्वाल, श्री.योगेश मिसाळ, सविताताई फ्फुके, ऐश्वर्याताई गाडेकर, श्री.राजेंद्र डकले, श्री.कल्याणदादा चव्हाण, सरपंच मनीषाताई चव्हाण, उपसरपंच श्री.किशोर चव्हाण, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांची उपस्थिती होती.

# 'महायुतीत चौथ्या सहकाऱ्याची गरज नाही'

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

आम्हा तिघांच्या महायुतीमध्ये चौथ्या सहकाऱ्याची गरज नसून, शेवटपर्यंत महाराष्ट्रात आमची महायुतीच राहील असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. एका खासगी वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात ते बोलत होते. मागील काही दिवसांत उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, संजय राऊत यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या कामाचे कौतुक केले. यामुळे मविआ सोडून उद्धव ठाकरेंचा गट महायुतीत प्रवेश करणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर विचारलेल्या प्रश्नाला मुख्यमंत्र्यांनी मोजक्या शब्दात स्पष्ट उत्तर दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी ज्या विचाराचे आहेत त्या विचारांचा मी वारसदार आहे, असेही त्यांनी एका प्रश्नाचे उत्तर देताना सांगितले.

उद्धव गटाकडून मुख्यमंत्र्यांच्या कामाचे कौतुक होत आहे, या संदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना, 'काही कौतुकांकडे दुर्लक्ष करायचे असते. कौतुकांबाबत सतर्क राहायचे असते. अनेकदा राजकारणात फूट पाडण्यासाठी अशा प्रकारे कौतुक केले जाते. राजकारणात एक लक्षात घेतले पाहिजे, की कोणी कितीही कौतुक केले तरी आपले पाय जमिनीवर असले पाहिजेत'; असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

उद्धव ठाकरे गटाचा भविष्यात महायुतीत समावेश करण्याबाबत विचार होऊ शकतो का ? या प्रश्नाचे उत्तर देताना 'आमच्या तीन खुर्च्यांचे स्थान मजबूत आहे. त्यामुळे चौथ्या सहकाऱ्याची आम्हाला गरज नाही. आमची महायुती मजबूत असून शेवटपर्यंत महाराष्ट्रात महायुतीच राहील'; असे मुख्यमंत्री फ्फडणवीस यांनी सांगितले.

'आम्हाला मिळालेले पद हे पद नसून, ती एक जबाबदारी आहे. मी उत्तराधिकाऱ्याच्या यादीत नाही. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी ज्या विचाराचे आहेत त्या विचारांचा मी वारसदार आहे'; असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. देशसेवा आणि समाजसेवा करण्याचे संस्कार लहानपणीच संघाच्या शाखेत जायचो तेव्हा झाले असल्याचे फडणवीस म्हणाले.

# महाविद्यालयीन तरुणाची रूममध्ये घुसून गळा चिरत निर्घृण हत्या

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

बीसीएसच्या १९ वर्षीय विद्यार्थ्याची तो राहत असलेल्या फ्लॅटमध्ये घुसून मारेकऱ्यांनी निघृण हत्या केल्याची थरारक घटना मंगळवारी (१४ जानेवारी) रात्री दहाच्या सुमारास उस्मानपुऱ्यातील भाजीवालीबाई पुतळ्यातील एका अपार्टमेंटमध्ये घडली. या घटनेने शहरात खळबळ उडाली.

प्रदीप विश्वनाथ निपटे (वय १९, रा. माजलगाव) असे हत्या झालेल्या विद्यार्थ्याचे नाव असून, तो छत्रपती संभाजीनगर शहरात देवगिरी महाविद्यालयात बीसीएच्या प्रथम वर्षात शिकत होता.

उस्मानपुऱ्यातील भाजीवालीबाई पुतळ्याजवळील अपार्टमेंटमध्ये ३ मित्र व मावसभावासह भाड्याने राहत होता. फ्लॅटमधील मित्र बाहेर गेले असताना मारेकऱ्यांनी डाव साधला. सूत्रांनी सांगितले, की कॉलेजमधून आल्यानंतर सायंकाळी त्याचा मावसभाऊ व मित्र बाहेर गेले होते. प्रदीप एकटाच फ्लॅटवर होता.

रात्री दहाला ते फ्लॅटवर परतले. काही वेळ त्यांचे प्रदीपकडे लक्ष गेले नाही. मात्र अर्धातास उलटूनही प्रदीप उठत नसल्याने एकाने पांघरूण काढले अनब सर्वांना धक्काच बसला. प्रदीपचा गळा कापलेल्या रक्तबंबाळ मृतदेह पाहून त्यांनी तातडीने उस्मानपुरा पोलिसांना कळवले. पोलीस निरीक्षक अतुल येरमे यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली.

# आध्यात्मिक संस्कृतीचा प्रमुख पाया सेवाभाव हेच प्रमाण मानून शासन कार्यरत- पंतप्रधान नरेंद्र मोदी

**रायगड** – भारताची आध्यात्मिक संस्कृती अभ्यासकांना समाजाशी जोडते, करुणा वाढवते आणि त्यांना सेवेकडे नेते. खरी सेवा ही नि:स्वार्थी असते. आपल्या आध्यात्मिक संस्कृतीचा मुख्य पाया सेवाभाव असून आपले सरकार हाच सेवाभाव ठेवून काम करीत असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज येथे केले.

भारताच्या सांस्कृतिक वारसाला चालना देण्याच्या वचनबद्धतेनुसार, पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांच्या हस्ते खारघर येथील श्री श्री राधा मदनमोहनजी मंदिर या इस्कॉन प्रकल्पाचे लोकार्पण झाले, त्यावेळी ते बोलत होते. नवी मुंबई मधील खारघर येथील नऊ एकर परिसरात वसलेल्या या प्रकल्पात अनेक देवदेवतांची मंदिरे, वैदिक शिक्षणाचे केंद्र, प्रस्तावित वस्तुसंग्रहालय, सभागृह, आणि उपचार केंद्र यांचा समावेश असून विश्वबंधुत्व, शांतता आणि सौहार्द वाढविणे, हे वैदिक शिक्षण केंद्राचे उद्दिष्ट आहे.



यावेळी व्यासपीठावर राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फ्फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार हेमा मालिनी, इस्कॉन मंदिर मुख्य चिकित्सक सूरदास प्रभु उपस्थित होते. प्रधानमंत्री श्री.मोदी यांचे स्वागत मुख्य चिकित्सक सूरदास प्रभू आणि खासदार हेमामालिनी यांनी केले. याप्रसंगी पंतप्रधान श्री.मोदी म्हणाले की, आपला भारत देश विलक्षण आणि अद्भुत भूमी असलेला आहे. देश केवळ भौगोलिक सीमांनी बांधलेला भूमीचा तुकडा नसून जिवंत संस्कृती आणि जिवंत भूमीचे प्रतीक आहे. आपल्या या संस्कृतीचे सार हे आध्यात्म आहे आणि भारताला समजून घेण्यासाठी आधी आध्यात्म स्वीकारले पाहिजे. जगाकडे केवळ भौतिक दृष्टीकोनातून पाहणारे भारताला विविध भाषा आणि प्रांतांचा संग्रह म्हणून पाहतात. जेव्हा कोणी त्यांचा आत्मा या सांस्कृतिक जाणिवेशी जोडतो तेव्हा त्यांना खऱ्या अर्थाने भारत दिसतो. संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी गीतेद्वारे भगवान कृष्णाचे गहन ज्ञान उपलब्ध करून दिले. त्याचप्रमाणे श्रील प्रभुपादांनी इस्कॉनच्या माध्यमातून गीता लोकप्रिय केली, भाष्य प्रकाशित केले आणि लोकांना तिच्या साराशी जोडले. वेगवेगळ्या ठिकाणी आणि काळात जन्मलेल्या या संतांनी प्रत्येकाने आपापल्या अनोख्या पद्धतीने कृष्णभक्तीचा प्रवाह पुढे नेला आहे. ते पुढे म्हणाले की, त्यांच्या जन्मकाळात, भाषांमध्ये आणि पद्धतींमध्ये फ्फरक असूनही, त्यांची समज, विचार आणि जाणीव एक होती आणि या सर्वांनी भक्तीच्या प्रकाशाने समाजात नवीन चैतन्य, प्रेरणा दिली. नवी दिशा आणि ऊर्जा दिली.

भारताच्या अध्यात्मिक संस्कृतीचा पाया ही सेवा आहे, असे नमूद करून श्री.मोदी यांनी अध्यात्मात देवाची सेवा करणे आणि लोकांची सेवा करणे हे एक होते यावर भर दिला. भारताची आध्यात्मिक संस्कृती अभ्यासकांना समाजाशी जोडते, करुणा वाढवते आणि त्यांना सेवेकडे नेते. खरी सेवा ही नि:स्वार्थी असते असा श्रीकृष्णाच्या श्लोकाचा उल्लेख करून पंतप्रधानांनी सर्व धार्मिक ग्रंथ आणि धर्मग्रंथ सेवेच्या भावनेवर आधारित असल्याचे अधोरेखित केले. इस्कॉन ही एक विशाल संस्था शिक्षण, आरोग्य आणि पर्यावरणासाठी योगदान देत सेवेच्या या भावनेने कार्यरत आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

कुंभमेळ्यात इस्कॉन महत्त्वपूर्ण सेवा उपक्रम राबवित असल्याचे त्यांनी नमूद केले. त्याच सेवेच्या भावनेने सरकार सातत्याने नागरिकांच्या कल्याणासाठी काम करीत असल्याबद्दल पंतप्रधानांनी समाधान व्यक्त केले. प्रत्येक घरात शौचालये बांधणे, उज्वला योजनेतून गरीब महिलांना गॅस कनेक्शन देणे, प्रत्येक घरात नळाला पाणी देणे, प्रत्येक गरीब व्यक्तीला ५ लाख रुपयांपर्यंत मोफ्फत वैद्यकीय उपचार देणे, ७० वर्षांवरील प्रत्येक वृद्ध व्यक्तीला ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असल्याचे ही त्यांनी यावेळी अधोरेखित केले. वयानुसार, आणि प्रत्येक बेघर व्यक्तीला पक्की घरे उपलब्ध करून देणे या सर्व कृती या सेवेच्या भावनेने चालतात. सेवेची ही भावना खरा सामाजिक न्याय मिळवून देते आणि खऱ्या धर्मनिरपेक्षतेचे प्रतिक आहे, यावर पंतप्रधानांनी भर दिला. कृष्णा सर्किटच्या माध्यमातून सरकार देशभरातील विविध तीर्थक्षेत्रे आणि धार्मिक स्थळांना जोडत आहे. हे सर्किट गुजरात, राजस्थान, हरियाणा, उत्तर प्रदेश आणि ओडिशापर्यंत विस्तारलेले आहे. स्वदेश दर्शन आणि प्रसाद योजनेंतर्गत या स्थळांचा विकास करण्यात येत असल्याचे सांगून त्यांनी कृष्णा सर्किटशी जोडलेल्या या श्रद्धा केंद्रांमध्ये भक्तांना आणण्यासाठी इस्कॉन मदत करू शकते, असे त्यांनी सुचविले. तसेच इस्कॉनला त्यांच्या केंद्रांशी संबंधित सर्व भाविकांना भारतातील अशा किमान पाच ठिकाणी भेट देण्यास प्रोत्साहित करण्याचे आवाहन केले.

ज्ञान आणि भक्तीच्या या महान धर्तीवर इस्कॉन मंदिराचे उद्घाटन होत आहे. श्री राधा मदनमोहनजी मंदिर संकुलाची रचना आणि संकल्पना अध्यात्म आणि ज्ञानाच्या संपूर्ण परंपरेचे प्रतिबिंबित करते. मंदिरात दिव्यत्वाची विविध रूपे दिसून येतात, जी 'एको अहं बहु स्यम' ही कल्पना व्यक्त करते. नवीन पिढीच्या आवडी आणि आकर्षणांना पूर्ण करण्यासाठी येथे रामायण आणि महाभारतावर आधारित संग्रहालय बांधले जात आहे. त्याचप्रमाणे वृंदावनच्या १२ वनांपासून प्रेरित एक बाग विकसित केली जात आहे. हे मंदिर भारताच्या चेतनेला श्रद्धेसह समृद्ध करणारे एक पवित्र केंद्र बनेल असा त्यांनी विश्वास व्यक्त केला. समाज जसजसा अधिक आधुनिक होत जातो तसतसा त्याला अधिक करुणा आणि संवेदनशीलतेची आवश्यकता असते. मानवी गुण आणि आपलेपणाची भावना असलेल्या संवेदनशील व्यक्तींचा समाज निर्माण करण्याची गरज आहे. इस्कॉन, त्यांच्या भक्ती वेदांताद्वारे जागतिक संवेदनशीलतेत नवीन जीवन फ्फुंकू शकते आणि जगभरात मानवी मूल्यांचा विस्तार करू शकते, असे सांगून शेवटी पंतप्रधानांनी विश्वास व्यक्त केला की, इस्कॉनचे सदस्य श्रील प्रभुपाद स्वामींच्या आदर्शांचे पालन करीत राहतील.

पंतप्रधान श्री.मोदी पुढे म्हणाले, गेल्या दशकात देशाने विकास आणि वारसा यामध्ये एकाच वेळी प्रगती पाहिली आहे. इस्कॉनसारख्या संस्थांचे वारशाच्या माध्यमातून विकासाच्या या मोहिमेत महत्त्वपूर्ण योगदान आहे.

मंदिरे आणि धार्मिक स्थळे शतकानुशतके सामाजिक जाणीवेचे केंद्र आहेत आणि गुरुकुलांनी शिक्षण आणि कौशल्य विकासाला चालना देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. इस्कॉन आपल्या कार्यक्रमांद्वारे तरुणांना अध्यात्माला त्यांच्या जीवनाचा भाग बनवण्यास प्रेरित करते. इस्कॉनचे तरुण अभ्यासक त्यांच्या परंपरांचे पालन करताना आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करतात, त्यांचे माहिती नेटवर्क हे इतरांसाठी एक आदर्श आहे. इस्कॉनच्या मार्गदर्शनाखाली, तरुण सेवा आणि समर्पणाच्या भावनेने राष्ट्रीय हितासाठी काम करतील, असा विश्वास आहे.

मंदिर संकुलात स्थापन झालेल्या भक्तीवेदांत आयुर्वेदिक उपचार केंद्र आणि भक्तिवेदांत वैदिक शिक्षण महाविद्यालयाचा समाज आणि संपूर्ण देशाला फ्फायदा होईल, असे सांगून पंतप्रधान श्री.मोदी यांनी 'हील इन इंडिया' असे आवाहनही केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक इस्कॉन मंदिराचे मुख्य चिकित्सक सूरदास प्रभू यांनी केले. या कार्यक्रमास इस्कॉन मंदिराचे सदस्य, प्रसिद्ध आध्यात्मिक नेते आणि संत आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'खंडणीच्या आड आल्याने देशमुख यांची हत्या'; युक्तिवादात विशेष तपास पथकाचा संशय

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

संतोष देशमुख हत्या प्रकरणातील संशयित आरोपी वाल्मीक कराड याची चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथकास जिल्हा न्यायालयाने सात दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली. हत्येच्या दिवशी मस्साजोगचे सरपंच देशमुख यांना कराड याने दिलेली धमकी, विष्णू चाटेच्या फोनवरून वाल्मीक कराडने अवादा कंपनीच्या अधिकाऱ्याकडे दोन कोटींची मागितलेली खंडणी आदी तपासातील बाजू राज्य गुन्हे अन्वेषण, विशेष तपास पथकाकडून न्यायालयात मांडण्यात आल्या.

खंडणीच्या आड संतोष देशमुख येत असल्यामुळेच त्यांना संपवण्यात आले का, असा संशय असल्याचा युक्तिवादही करण्यात आला. कराडशी आरोपींचे केवळ फ्फोनवरून संभाषण झाले. यावरून खुनाशी संबंध जोडून आणि मकोकाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला का, अशी विचारणा बीड जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती सुरेखा पाटील यांनी तपास अधिकाऱ्यांना केला. त्यावर तांत्रिक पुरावे, फोनवरून झालेले संभाषण, ९ डिसेंबर रोजी संतोष देशमुख यांचे अपहरण आणि हत्या झाली त्या वेळी आरोपी विष्णू चाटे व सुदर्शन घुले यांचे कराड याच्याशी झालेले संभाषण, हत्येच्या दिवशीही संतोष देशमुख यांना कराड याने दिलेली धमकी, विष्णू चाटेच्या फ्फोनवरून वाल्मीक कराडने अवादा कंपनीच्या अधिकाऱ्याकडे दोन कोटींची मागितलेली खंडणी आदी तपासातील बाजू राज्य गुन्हे अन्वेषण, विशेष तपास पथकाकडून न्यायालयात मांडण्यात आल्या. वाल्मीक कराडची परदेशात कुठे कुठे मालमत्ता आहे, याचीही चौकशी करायची असल्याचे सरकारी पक्षाकडून न्यायालयात सांगण्यात आले. वरील मुद्द्यांवरून वाल्मीक कराडला १५ दिवसांची पोलीस कोठडी देण्याची विनंती करण्यात आली. त्याला वाल्मीक कराडचे वकील अॅड. सिद्धेश्वर ठोंबरे यांनी विरोध केला.

वाल्मीक कराडला पोलीस कोठडी सुनावण्यात आल्यानंतर त्याचे समर्थक आक्रमक झाले. तत्पूर्वीच न्यायालयाबाहेर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलिसांना समर्थकांना पांगवण्यासाठी कसरत करावी लागली. तर, कराडच्या मूळ गावी पांगरी येथे महिलांनी रास्ता रोको केला. एक महिला आणि एका पुरुषाने अंगावर ज्वलनशील पदार्थ ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. परळीत अनेक भागांत दुसऱ्या दिवशीही बंद पाळण्यात आला.

### बीड, परभणीतील घटनांबाबत चौकशीला वेग

- बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाच्या चौकशीसाठी कुटुंबीयांनी आंदोलन केल्यानंतर हालचालींना वेग आला आहे.
- बीड आणि परभणी प्रकरणाच्या चौकशीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत जाहीर केल्यानुसार चौकशीसाठी निवृत्त न्यायाधीशांची समिती स्थापन करण्यात आली आहे.
- संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या चौकशीसाठी निवृत्त न्यायमूर्ती एम. एल. ताहलियानी यांची एक सदस्यीय समिती तर परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूच्या चौकशीसाठी व्ही. एल. आचलिया यांची एक-सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे.
- संतोष देशमुख हत्या प्रकरणात नेमण्यात आलेल्या न्यायमूर्ती ताहलियानी समितीचे मुख्यालय हे बीड येथेच राहणार असून परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी यांच्या तुरुंगातील मृत्यू प्रकरणाच्या चौकशीसाठी न्यायमूर्ती आचलिया यांच्या समितीचे मुख्य कार्यालय परभणी येथे राहणार आहे.
- या समित्या प्रकरणाची चौकशी करून आपला अहवाल तीन ते सहा महिन्यांच्या कालावधीत सरकारला सादर करणार आहेत.

# मकर संक्रांत : घरोघरी हळदी कुंकूवाच्या समारंभाचे आयोजन







**नवीन वर्षातील पहिला सण मकर संक्रांती हा सण मोठ्या उत्साहात साजरा होतो. महिला मकर संक्रांतीपासून रथसप्तमीपर्यंत घरोघरी हळदी कुंकूवाचा समारंभाचे आयोजन करतात. मकर संक्रांतीत हळदी कुंकूवाचा सण का साजरा करतात. पौराणिक कथेनुसार सुहासिनीमधील आदिशक्तीला शरण जाऊन तिच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा सण असतो. हळदीकुंकू करणे म्हणजे एकप्रकारे ब्रह्मांडातील सुप्त आदिशक्तीच्या लहरींना जागृत होण्यासाठी त्यांना आवाहन करणे असं मानले जाते. यावेळी हळदीकुंकूवाचा सोहळा रथसप्तमीपर्यंत करु शकता.**

# गल्लेबोरगाव येथे महसूल फेरफार अदालत संपन्न




**खुलताबाद (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

तालुक्यातील गल्ले बोरगाव येथे खुलताबाद तहसील कार्यालयाचे वतीने आयोजीत फफेरफफार अदालत संपन्न झाली, दरम्यान या वेळी सनियंत्रण अधिकारी तहसीलदार स्वरूप कांकळ यांच्या मार्गदर्शनाखाली वेरूळ मंडळातील ८३ प्रलंबित असलेले फफेरफफार प्रकरणे निकाली काढण्यात आले.

तहसीलदार स्वरूप कंकाळ यांनी या विषयी अधिक माहिती देताना सांगितले की, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांचे निर्देशान्वये, महसूल विभाग खुलताबाद यांचे वतीने तालुक्यातील मोठ्या प्रमाणात प्रलंबित असलेले फफेरफफार प्रकरणे निकाली काढून शून्य प्रलंबितता आणण्यासाठी उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांच्या मार्गदर्शनाखाली कालबद्ध कार्यक्रम आखण्यात आला होता, त्या अनुषंगाने आज गल्लेबोरगाव येथे या फफेरफफार आदालतीचे आयोजन करण्यात आले असून, या मध्ये प्रलंबित असलेले सर्व फफेरफफार निकाली काढण्यात येणार आहे. ज्या नागरिकांचे फफेरफफार प्रलंबित असतील त्यांनी आवश्यक ते अभिलेख सादर करून या फफेरफफार अदालतीचा लाभ घ्यावा असे ही त्यांनी या वेळ

# ऐतिहासिक! भारताच्या महिला संघाने नोंदवला इतिहासातील सर्वात मोठा विजय, आयर्लंडचा उडवला धुव्वा

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

भारतीय संघाने आयर्लंडविरूद्ध मालिकेत ३-० असा निर्भेळ विजय मिळवला आहे. भारताच्या महिला संघाने संपूर्ण मालिकेत दमदार काम गिरी करत अनेक विक्रम आपल्या नावे केले आहेत. या मालिकेतील तिसरा वनडे सामना राजकोटमध्ये खेळवला गेला. या सामन्यात भारताने प्रथम फफलंदाजी करताना ५ बाद ४३५ धावा ऐतिहासिक धावसंख्या उभारली. सर्वात मोठ्या वनडे धावसंख्येनंतर भारताने वनडे क्रिकेटमध्ये सर्वात मोठा विजय नोंदवला आहे.

भारतीय संघाने आयर्लंड संघावर ३०४ धावांनी मोठा विजय नोंदवला आहे. भारतीय संघाच्या वनडे इतिहासातील हा सर्वात मोठा विजय आहे. या सामन्यात टीम इंडियाने नाणेफफेक जिंकून प्रथम फफलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय योग्य ठरला आणि भारतीय संघाने ५० षटकांत ५ गडी गमावून ४३५ धावा केल्या. महिला एकदिवसीय सामन्यात ४०० धावांचा टप्पा पार करणारा भारतीय संघ पहिला




आशियाई संघ आहे. टीम इंडियाने मागील सामन्यातही ३७० धावसंख्या उभारली आहे. यादरम्यान सलामीवीर प्रतिका रावल आणि स्मृती मानधना यांनी शतकी खेळी केल्या. त्याचवेळी यष्टीरक्षक ऋचा घोषनेही झटपट अर्धशतक झळकावले.

यापूर्वी, २०१७ मध्ये, भारतीय महिला संघाने आयर्लंड विरुद्धचा एकदिवसीय सामना २४९ धावांनी जिंकला होता, त्यावेळेस भारतीय संघाची कर्णधार मिताली राज होती. आता स्मृती मानधनाच्या नेतृत्वाखाली भारताने हा विक्रम मागे टाकला आणि ३०४ धावा करत इतिहास घडवला आहे. कारण पहिल्यांदाच भारतीय महिला संघाने ३०० हून अधिक धावांनी एकदिवसीय सामना जिंकला आहे.

४३६ धावांच्या डोंगराएवढ्या लक्ष्याचा पाठलाग करताना आयरिश संघाची सुरूवात खूपच खराब झाली. आयर्लंडचा संघ केवळ ३१.४ षटकेच खेळू शकला आणि १३१ धावा करून सर्वबाद झाला. यादरम्यान एकाही आयरिश फफलंदाजाला ५० धावांचा टप्पा गाठता आला नाही. तर दीप्ती शर्माने टीम इंडियाकडून सर्वाधिक ३ विकेट घेतले. तनुजा कंवर हिलाही २ विकेट मिळवण्यात यश आले. तितास साधू, सायली सातघरे, मिन्नू मणी यांनीही प्रत्येकी १ विकेट घेतली.

# दूध भेसळ तपासणीत दोषी आढळल्यास कारवाई होणार- नरहरी झिरवाळ

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

आरोग्याच्या दृष्टिकोनातून दूध हे शरीरासाठी खूप उपयुक्त असून मोठ्या प्रमाणावर दुधाचा वापर लहान बालकांपासून ते वृद्ध व्यक्तींपर्यंत पिण्यासाठी केला जातो. मात्र राज्यात काही ठिकाणी दुधात भेसळीचे प्रकार होत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यानुसार अन्न व औषध प्रशासन विभागाने आज एकाच दिवशी दूध भेसळ तपासणी मोहीम राबविण्यात येऊन १ हजार ६२ दुधाचे सर्वेक्षण नमुने विश्लेषणासाठी ताब्यात घेतले. या तपासणी नमुन्यात दोषी आढळणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याच्या सूचना प्रशासनास देण्यात आल्या आहेत अशी माहिती, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिली.

अन्न व औषध प्रशासन विभाग अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ नियम व नियमन २०११ ची अंमलबजावणी करुन राज्यातील नागरिकांना सकस व निर्भेळ अन्नपदार्थ उपलब्ध करुन त्यांचे जीवनमान उंचावण्याबाबत विविध उपाययोजना करीत असल्याचे मंत्री श्री. झिरवाळ यांनी



सांगितले. दूध/दुग्धजन्य अन्नपदार्थात भेसळ करणाऱ्यांवर जरब बसण्याकरिता व भेसळ रोखण्याकरिता तसेच राज्यातील जनतेस उपलब्ध होणाऱ्या दूध व दुग्धजन्य अन्नपदार्थांची गुणवत्ता तपासण्याच्या अनुषंगाने आज १५ जानेवारी रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फफडणवीस , उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार , अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, राज्यमंत्री योगेश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनामार्फत संपूर्ण राज्यात व्यापक स्वरूपात दूध या अन्नपदार्थाची सर्वेक्षण मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेअंतर्गत एकाचवेळी राज्यभरातील विविध ठिकाणांहून दूधाचे सर्वेक्षण नमुने घेऊन त्यांच्या गुणवत्तेची तपासणी करण्यासाठी १०३ अन्न सुरक्षा अधिकारी यांना सर्वेक्षण नमुने घेण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार आज सकाळी ५.०० वाजेपासून राज्यभरातील अन्न सुरक्षा अधिकारी यांनी दूध उत्पादक, वितरक, विक्रेते व रस्त्यावरील विक्री केंद्रांवरून १ हजार ६२ दुधाचे सर्वेक्षण नमुने विश्लेषणासाठी घेतले.

त्यापैकी राज्यात विक्री होणाऱ्या विविध ब्रान्डच्या दुधाचे ६८० पाउच / पिशवी पॅकिंग मधून व ३८२ सुट्या स्वरूपातील दुधाचे आहेत. ताब्यात घेण्यात आलेले नमुने अन्न सुरक्षा व मानके प्राधिकृत अन्न प्रयोगशाळेत पाठवून भेसळ, रसायनांचे प्रमाण व दूधाच्या गुणवत्तेची तपासणी केली जाणार आहे.

या सर्वेक्षण नमुने विश्लेषणांती दुधाच्या नमुन्यामध्ये भेसळ आढळल्यास तात्काळ या आस्थापनेमधून कायदेशीर नमुने घेऊन संबंधित उत्पादक व पुरवठादार यांचेवर अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार कठोर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

अन्न व औषध प्रशासन आयुक्त राजेश नार्वेकर यांनी सांगितले की, दूधातील भेसळ ही गंभीर समस्या आहे. नागरिकांच्या आरोग्यावर होणारा परिणाम टाळण्यासाठी दूध भेसळ हा विषय गांभीर्याने घेतला आहे.

भेसळ करणाऱ्या व्यक्तींविरोधात कठोर कारवाई घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुषंगाने आज राज्यभरामध्ये दूधाचे सर्वेक्षण नमुने घेण्याची मोहीम राबविण्यात आली आहे.

अन्न भेसळ रोखण्यासाठी अशा प्रकारच्या मोहिमा वारंवार घेण्यात येणार आहेत. नागरिकांनी दूध किंवा अन्नपदार्थांमध्ये भेसळ दिसल्यास अन्न व औषध प्रशासनाच्या हेल्पलाइन क्रमांक 1800222365 वर त्वरित संपर्क साधावा किंवा jc-foodhq@gov.in या ईमेल वर किंवा https://foscos.fssai.gov.in/consumergrievance या पोर्टलवर तक्रार नोंदवावी. असे आवाहन अन्न व औषध प्रशासन आयुक्त राजेश नार्वेकर यांनी केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४ ५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४ ३ १ ० ० ५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४ ३ १ ० ० ३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

•**Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** •Email : **attalsanket2023@gmail.com** •**RNI No. MAHMAR/2023/87816**